CAPITAL FLOAT

२०२१

# संबंधित पार्टी व्यवहार धोरण व्ही [V] १.१

या दस्तात संबंधित पार्टी व्यवहारांच्या एनबीएफसीज [NBFCs]साठी महत्वाच्या वैशिष्ट्यांचा तपशिल आहे.

© कॅपिटल फ्लोट फिनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमि

## १. प्रस्तावना

कॅपिटल फ्लोट फिनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड हे जाणते की संबंधित पार्टी व्यवहारांमुळे संभाव्य अथवा प्रत्यक्ष हितसंबंध संघर्ष उद्भवू शकतात आणि असा प्रश्न उभा राहू शकतो की असे व्यवहार कंपनी व तिच्या भागधारकांच्या सर्वोच्च हिताला पूरक आहेत का आणि ते करताना कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") मधील तरतूदी आणि मास्टर डिरेक्शन- नॉन बँकिंग फिनान्शियल कंपनी - सिस्टिमॅटिकली इम्पॉर्टन्ट नॉन-डिपॉझिट टेकिंग कंपनी अँन्ड डिपॉझिट टेकिंग कंपनी (रिझर्व बँक) आदेश, २०१६ ("आदेश") यांचे पालन होते का.

लेखापरीक्षण समितीच्या शिफारसींवर आधारून या धोरणात वेळोवेळी दुरुस्त्या; जर असतील तर; करण्याबाबत कंपनीच्या संचालक मंडळाकडून विचार केला जाईल.

हे धोरण कंपनी आणि तिच्या एक किंवा अधिक संबंधित पार्टीज यांच्यातील व्यवहारांना लागू होते. ते संबंधित पार्टी व्यवहारांचे व्यवस्थापन आणि अहवाल देण्याबाबत एक ढाचा पुरवते ज्यात मूर्त व्यवहार समाविष्ट आहेत

## २. उद्देश

कॅपिटल फ्लोट फिनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि तिच्या संबंधित पार्टीज यांच्यातील व्यवहारांना योग्य संमती देण्याबाबत आणि त्यांचा अहवाल देण्याबाबत व्यवस्थापकीय ढाचा वर्णित करणे हा या धोरणाचा उद्देश आहे. कंपनीला आपले दर वर्षीचे वित्तीय विवरण आणि संचालक मंडळाचा अहवाल यांमध्ये कंपनी आणि संबंधित पार्टीज यांच्यातील सर्व मूर्त व्यवहार उघड करणे बंधनकारक असते. कंपनीला आपल्या वेबसाईटवर संबंधित पार्टीज व्यवहार हाताळण्याचे धोरण उघड करणे आणि त्याची लिंक वार्षिक अहवालात देणे बंधनकारक असते

## ३. व्याख्या

**संबंधित पार्टी:-** एखादी संस्था कंपनीची संबंधित पार्टी असल्याचे मानले जाण्याचे निकष खालीप्रमाणे आहेत:

(अ) अशी संस्था कंपनी कायदा २०१३ च्या कलम २(७६) नुसार संबंधित पार्टी असेल; किंवा

(ब)इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) [ICAI] ने जारी केलेल्या, लागू असलेल्या हिशेबाच्या मानकांनुसार अशी संस्था संबंधित पार्टी असेल.

**संबंधित पार्टी व्यवहार किंवा आरपीटी [RPT]** म्हणजे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८८(१) खालील आणि / किंवा खाली नमूद केलेली(आयसीएआय) [ICAI] ने जारी केलेली वेळोवेळी दुरुस्त्या झालेली लागू

असलेली हिशेबाची मानके यांच्यानुसार असलेला करारनामा किंवा व्यवस्था.

**मूर्त संबंधित पार्टीव्यवहार** म्हणजे संबंधित पार्टीशी झालेला व्यवहार तेव्हा मूर्त मानला जाईल जेव्हा एका वित्तीय वर्षातील एक वैयक्तिक व्यवहार किंवा त्यापूर्वीच्या व्यवहारांसह संयुक्तपणे; कंपनीच्या मागील लेखा परीक्षित आर्थिक विवरणानुसार असलेल्या कंपनीच्या वार्षिक एकत्रित उलाढालीच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक असेल किंवा अशी मर्यादा जी कंपनी कायद्यानुसार वेळोवेळी प्रस्तावित केली जाईल.

## १. संबंधित पार्टीची ओळख पटवणे

कंपनी कायदा २०१३ (त्यामध्ये अंतर्भूत नियमांसह वाचला असता),च्या कलम २(७६) मध्ये नियत केलेल्या संबंधित पार्टीच्या व्याख्येनुसार ओळख पटवलेल्या कंपनीच्या संबंधित पार्टीजचा डेटाबेस कंपनीची सेक्रेटरिअल टीम सातत्याने ठेवेल. डेटाबेसमध्ये व्यक्ती आणि कंपन्या यांची नावे त्यांच्या वैयक्तिक / कंपनी तपशिलासह असायला हवीत ज्यात त्यांमध्ये झालेले कुठलेही बदल अंतर्भूत आहेत.

## २. संबंधित पार्टी व्यवहाराची ओळख पटवणे

- कायद्याचे कलम १८८ आणि किंवा (आयसीएआय) [ICAI] ने जारी केलेल्या, लागू असलेल्या हिशेबाच्या मानकांनुसार कंपनी संबंधित पार्टी व्यवहारांची ओळख पटवते. कंपनी हे सुद्धा ठरवते की व्यवहार व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजात आणि एक हाताचे अंतर ठेवणे तत्वावर घडला आहे का आणि यासाठी गरज पडल्यास कंपनी बाहेरील व्यावसायिकाचे मत मागवते.

- संचालक मंडळ व लेखापरीक्षण समिती यांच्या एका वित्तीय वर्षातील अखेरच्या बैठकीत कंपनीने त्यानंतर लगोलग येणाऱ्या वित्तीय वर्षातील अंदाजित संबंधित पार्टी व्यवहाराला संमती द्यायला हवी.

## ३. संबंधित पार्टी व्यवहारांचा आढावा आणि संमती

<u>६.१ लेखापरीक्षण समिती</u>

**६.१.१** आरपीएटीज [RPTs ] म्हणून ओळख पटवल्या गेलेल्या सर्व व्यवहारांच्या बाबतीत ते

@ कॅपिटल फ्लोट फिनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

ूर्वी लेखापरीक्षण समितीकडून त्यांसाठी पूर्वसंमती घेतेली जायला हवी , मग ती ात असो की परिपत्रकाद्वारे संमत केलेली असो की इलेक्ट्रॉनिक पद्धतीने घेतलेली असो. आरपीएटी [RPT] ला संमती देण्यावर चर्चा करताना लेखापरीक्षण समिती सर्व संबंधित मुद्दे लक्षात घेईल. मात्र वरील तरतूद अशा व्यवहाराला लागू होणार नाही जो कायद्याच्या कलम १८८ नुसार कंपनी व होल्डिंग कंपनी यांच्यातील व्यवहाराव्यतिरिक्त असेल.

**६.१.२**कुठल्याही संबंधित पार्टी व्यवहारात समितीच्या एखाद्या सभासदाचे संभाव्य हितसंबंध असतील तर असा सभासद आपण होऊन माघार घेईल आणि चर्चेत सहभागी होणे टाळेल आणि तो संबंधित पार्टी व्यवहार संमत करण्यावरील मतदानात भाग घेणार नाही. एखादा संबंधित पार्टी व्यवहार

अ. जो व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजात घडलेला नाही किंवा

ब. एक हाताचे अंतर ठेवणे किंमतीला घडलेला नाही
त्याला पुढे चर्चा केलेली आहे त्यानुसार संचालक मंडळाची किंवा
भागधारकांची संमती आवश्यक असेल.

**६.१.३** पुनरावृत्त होणाऱ्या संबंधित पार्टी व्यवहारांना, कंपनी कायदा, २०१३च्या तरतूदींखाली नमूद केलेले निकष / अटी आणि इतर अशा अटी ज्या या धोरणाला सुसंगत असतील आणि कंपनीच्या हिताच्या असतील अशांना अधीन राहून; लेखापरीक्षण समिती बहुउद्दिष्टसाधक (ओम्निबस) संमती देऊ शकते. अशी बहुउद्दिष्टसाधक संमती एका वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी वैध असेल आणि ते एक वर्ष संपल्यानंतर नव्याने संमती घेणे आवश्यक असेल.बहुउद्दिष्टसाधक संमतीत खाली बाबी स्पष्ट केल्या जातील:

**अ.** संबंधित पार्टीचे(पार्टीजची) नाव(नावे), व्यवहाराचा प्रकार, व्यवहाराचा कालावधी, कमाल किती रकमेसाठी व्यवहार केला जाईल आणि
**ब.** दर्शवली गेलेली बेस किंमत / सध्याची करारान्वये असणारी किंमत आणि किमतीत बदल करण्यासाठी सूत्र, असल्यास.
**क.** इतर अशा अटी ज्या लेखापरीक्षण समितीला योग्य वाटतील. कंपनीचे अंगीकृत व्यवसाय विकणे अथवा त्यांची विल्हेवाट लावणे यांच्याशी निगडित व्यवहारांना बहुउद्दिष्टसाधक संमती दिली जाणार नाही.

**६.१.४** बहुउद्दिष्टसाधक संमतीच्या अनुसार कंपनी जे संबंधित पार्टी व्यवहार करेल त्यांच्या तपशिलाचा आढावा लेखापरीक्षण समिती त्रैमासिक तत्वावर घेईल.

**६.१.५** ज्यांसाठी बहुउद्दिष्टसाधक संमती घेतलेली नाही किंवा एरवीही ज्यांना लेखापरीक्षण समितीने पूर्वसंमती दिलेली नाही असे आरपीटीज [RPTs] कायद्याच्या कलम१७७ च्या अनुसार मंजूरीसाठी समितीसमोर ठेवले जातील.

या धोरणाशी सुसंगत नसतील अशा आरपीटीज [RPTs]ना मंजूरी देणे, त्यांमध्ये दुरुस्ती करणे वा ते थांबवणे याबाबतीतले अधिकार लेखापरीक्षण समितीला असतील

**६.१.६**

**<u>६.२ संचालक मंडळ</u>**

**६.२.१** व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजात घडलेले नाहीत किंवा एक हाताचे अंतर ठेवणे किंमतीला घडलेले नाहीत म्हणून संचालक मंडळाने संदर्भित केलेले आरपीटीज [RPTs] असतील

अ. तर अशा बाबतीत असे व्यवहार फक्त
ब. लेखापरीक्षण समितीने शिफारस केल्यावरून संचालक मंडळाने पूर्वसंमती दिल्यानंतरच केले जातील.

६.२.२ व्यवहाराचा प्रकार, मूर्त अटी, किंमत ठरवण्याची पद्धती आणि असे व्यवहार करण्यामागची व्यावसायिक तर्किकता अशासारखे घटक संचालक मंडळ विचारात घेईल. असा विचार केल्यानंतर संचालक मंडळ व्यवहाराला संमती देईल किंवा व्यवहाराच्या अटींमध्ये त्या परिस्थितीत त्यांना योग्य वाटतील असे बदल करायला लावतील.

६.२.३ कुठल्याही संबंधित पार्टी व्यवहारात संचालक मंडळाच्या एखाद्या सभासदाचे संभाव्य हितसंबंध असतील तर असा सभासद आपण होऊन माघार घेईल आणि चर्चेत सहभागी होणे टाळेल आणि तो संबंधित पार्टी व्यवहार संमत करण्यावरील मतदानात भाग घेणार नाही.

**६.३ भागधारक**

एखादा संबंधित पार्टी व्यवहार व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजात घडलेला नसेल किंवा एक हाताचे अंतर ठेवणे किंमतीला घडलेला नसेल आणि तो मूर्त संबंधित पार्टी व्यवहार असेल तर अशा व्यवहाराला भागधारकांची ठरावाद्वारे संमती लागेल.

**६.४ आरपीटीज [RPTs] चा अहवाल देणे**

६.४.१ ज्याला या धोरणाअंतर्गत संचालक मंडळ / भागधारक यांची संमती आवश्यक असेल असा प्रत्येक करारनामा किंवा व्यवस्था यांचा संदर्भ तो करारनामा अथवा व्यवस्था करण्यामागच्या स्पष्टीकरणासह भागधारकांना संचालक मंडळातर्फे दिलेल्या अहवालात दिला

@कॅपिटल फ्लोट फिनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

**६.५ पूर्वसंमती न घेतलेले आरपीटीज [RPTs]**

६.५.१ एखाद्या आरपीटीला [RPT] या धोरणाखाली संमती अथवा मंजूरी दिली गेलेली नाही असे संचालक मंडळाच्या लक्षात आले तर अशा बाबतीत असा व्यवहार व्यवहार्य असेल तितक्या लवकर या धोरणाखाली आणि वेळोवेळी दुरुस्त केल्या गेलेल्या लागू असलेल्या कायद्यांनुसार व नियमांनुसार आवश्यक असेल त्यानुसार लेखापरीक्षण समिती किंवा संचालक मंडळ किंवा भागधारक यांच्यासमोर ठेवला जाईल.

६.५.२ समिती किंवा संचालक मंडळ किंवा भागधारक अशा व्यवहाराशी संबंधित सर्व वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेतील आणि कंपनीला उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायांचे मूल्यमापन करतील ज्यात मंजूरी, दुरुस्ती किंवा व्यवहार थांबवला जाणे यांचा समावेश असेल पण त्यावर सीमित नसेल आणि अशा परिस्थितीत समितीला योग्य वाटेल अशी कार्यवाही कंपनी करेल.